प्रकरण पहिले

# सत्यशोधक चळवळ आणि कृष्णराव भालेकर

प्रकरण पहिले

# सत्यशोधक चळवळ आणि कृष्णराव भालेकर

**प्रस्तावना :**

प्रस्तुत प्रकरणात कृष्णराव भालेकर यांचे जीवनकार्य व सामाजिक कार्याचा अभ्यास करावयाचा आहे. महात्मा फुले यांच्या प्रेरणेतून सत्यशोधक चळवळ उदयास आली. या चळवळीतील एक निष्ठावान कार्यकर्ता म्हणून भालेकरांचे स्थान महत्त्वाचे आहे. सत्यशोधक चळवळीतील भालेकरांच्या कार्याची माहिती घ्यावयाची आहे.

भालेकरांनी 'हितोपदेशक भजन समाज', 'सुशिक्षणगृह', 'दीनबंधू सार्वजनिक सभा' व 'दीनमित्र फ्री स्कूल' यासारख्या संस्था निर्माण केल्या. व्याख्याने, सभा, परिषद, दौरे वगैरे आयोजित केले. 'दीनबंधू', 'दीनमित्र', 'अंबालहरी' व शेतकऱ्यांचा कैवारी ही वर्तमानपत्रे सुरू केली. तसेच भालेकरांनी काढलेली चित्रे व 'पंचखेळ' यांचाही समावेश केला आहे.

**जीवनपट :**

कृष्णराव भालेकर हे प्रतिभासंपन्न लेखक, कवी, पत्रकार आणि उत्तम वक्ते होते. यांचा जन्म १८५० साली पुण्याजवळील भांबुर्डे येथे झाला. कृष्णरावांचे आजोबा राणोजी भालेकर हे आर्थिक परिस्थिती बऱ्यापैकी असलेले शेतकरी होते. त्यांचे वडील पांडुरंगराव भालेकर डिस्ट्रिक्ट कोर्टाच्या नाझर कचेरीत भत्ते कारकून होते. काही दिवसांनी ते गाव रजिस्टर झाले. हे पिढीजात वारकरी असल्याने ज्ञानेश्वरी प्रवचन करीत.

या सुमारास कृष्णराव भालेकर पुणे येथील रविवार पेठेत मिशन स्कूल चौथीमध्ये शिकत होते. त्यांचे बंधू रामचंद्र भालेकर यांनी शिक्षणाचा भार उचलला. परंतु घरच्या बिकट परिस्थितीमुळे पुणे येथे डिस्ट्रिक्ट जज्ज कोर्टातील इंग्रजी ऑफिसात उमेदवारी करावी लागली. भालेकर हे जात्याच तीक्ष्ण बुद्धिचे होते. इ. स. १८६८ मध्ये त्यांनी भांबुर्ड्यास 'सत्यनारायण पुराणिक' व 'अज्ञानराव भोळे देशमुख' नावाचे फार्स केले. त्यांचे हे कार्य पाहून महात्मा फुले भारावून गेले व ते भालेकरांना भांबुर्ड्यास भेटावयास गेले. त्याचवेळी सत्यशोधक समाजाची चळवळ सुरू झाली होती. भालेकर त्या चळवळीस जाऊन मिळाले.

इ. स. १८७१ मध्ये त्यांनी भांबुर्ड्यास 'हितोपदेशक' भजन समाज नावाची संस्था स्थापन केली होती.

भालेकर हे कल्पकबुद्धीचे व महात्त्वकांक्षी होते. ते निर्भिड व धाडसी स्वभावाचे वक्ते होते. ब्राह्मण शक्तीला न घाबरता पुण्यातील वेगवेगळ्या पेठांत जाऊन व्याख्याने करत असत. भालेकर हे तालीमबाज असल्याने त्यांची प्रकृती मजबूत होती. इ. स. १८७४ साली त्यांनी एका कुस्तीत कडे मिळविले होते. त्यानंतर त्यांनी डिस्ट्रिक्ट जज्जांचे कोर्टातील कारकुनाची नोकरी सोडली. इ. स. १८७५ मध्ये रामचंद्र हरी शिंदे व जोतीराव फुले यांनी 'पुना कमर्शिअल ॲण्ड कॉन्ट्रक्टिंग कंपनी' काढली. या कंपनीने पुण्याजवळील खडकवासला कॅनॉल राइट बँकेच्या कामाचे कंत्राट घेतले होते. त्यांनी भालेकरांना या कंपनीत भागीदार करून घेतले. अशा प्रकारे उपजीविकेची सोय झाल्यामुळे त्यांचे लक्ष अधिक चळवळीकडे वेधले गेले.

याच काळात स्वामी दयानंद सरस्वती पुण्याला आले होते. तेव्हा त्यांना भांबुर्ड्यास नेऊन रोकडोबाच्या देवळामागच्या धर्मशाळेत त्यांचे भाषण घडवून आणले. त्यांच्या धाडसी कृत्यामुळे सत्यशोधक समाजाच्या कार्याला गती येऊ लागली. गोरगरिबांसाठी, शेतकऱ्यांसाठी आयुष्यभर सतत कार्य करत राहिले.

त्याचबरोबर कृष्णराव भालेकर हे ललित लेखक आहे. त्यांनी पोवाडे, लावणी, अभंग, पदे, श्रीखंड, कादंबरी असे गद्य-पद्य साहित्य लिहिले. 'दीनबंधू', 'दीनमित्र', 'शेतकऱ्यांचे कैवारी' यासारख्या पत्राचे संपादन केले. त्यातून हे साहित्य प्रसिद्ध केले. 'हितोपदेशक भजन समाज', 'सुशिक्षणगृह' 'दीनबंधू सार्वजनिक सभा' व 'दीनमित्र फ्री स्कूल' या सारख्या संस्था स्थापन केल्या. अनेक व्याख्याने, सभा, परिषदा, दौरे, व्याख्याने आयोजित केले होते. आपले सर्व आयुष्य त्यांनी सत्यशोधक समाजासाठी व्यतित केले.

**सत्यशोधक समाज**

महात्मा फुले यांनी २४ सप्टेंबर १८७३ रोजी पुणे येथे सत्यशोधक समाजाची स्थापना केली. 'सत्यशोधक' म्हणजे सत्याचा शोध घेणारा'. आधुनिक भारतामध्ये सामाजिक

पुनर्घटनेसाठी चळवळी सुरू करणारी पहिली संस्था म्हणजे सत्यशोधक समाज होय. सत्यशोधक समाजाने सामाजिक गुलामगिरीविरूद्ध हल्ला चढविला. सामाजिक न्यायाची व हक्कांच्या पुनर्रचनेची मागणी केली. हजारो वर्षांपासून समाज अज्ञानाच्या अंध:कारात खितपत पडलेला होता. या दडपून टाकलेल्या समाजाचा आवाज होय. शूद्रातिशूद्रवर्गाचा उद्धार करणे या उद्देशाने हा समाज स्थापन झाला आहे.

'सत्यशोधक' चळवळ ही ग्रामीण भागात पोहोचणारी पहिली चळवळ होय. सत्यशोधक समाजाच्या स्थापनेबाबत सत्यशोधक समाजाच्या पहिल्या वार्षिक रिपोर्टात म्हटले आहे. 'ब्राह्मण, भट, जोशी, उपाध्ये इत्यादीक लोकांच्या दास्यत्वापासून शूद्र लोकांस मुक्त करण्याकरिता व आपल्या मतलबी ग्रंथाच्या आधारे आज हजारो वर्षे ते शूद्र लोकांस नीच मानून गफलतीने लुटीत आले आहेत. यास्तव सदुपदेश व विद्याद्वारे त्यास त्यांचे वास्तविक अधिकार समजून देण्याकरिता म्हणजे धर्म व व्यवहारासंबंधी ब्राह्मणांचे बनावट व कार्यसाधक ग्रंथापासून त्यांना मुक्त करण्याकरिता सत्यशोधक समाजाची स्थापना झाली. यात राजकीय विषय वर्ज्य आहेत.''[१] शूद्रातिशूद्र लोकांची पुरोहितांकडून होणारी पिळवणूक बंद करणे, त्यांना मानवी हक्कांची आणि अधिकारांची जाणीव करून देणे. ब्राह्मणी शास्त्रांच्या मानसिक व धार्मिक गुलामगिरीतून सुटका करणे, कनिष्ट वर्गातील लोकांना शिक्षणाचे महत्त्व पटवून देणे. हा सत्यशोधक चळवळीचा प्रमुख उद्देश होता. तळागाळातील लोकांना ज्ञान मिळावे व शिकून शहाणी व्हावीत. यासाठी या चळवळीतील समाजसुधारकांनी प्रयत्न केले. या चळवळीची प्रमुख तत्त्वे –

१) ''ईश्वर हा एक असून तो सर्वश्रेष्ठ आहे. सर्व मानव प्राणी त्याची लेकरे आहेत.

२) प्रत्येक मानवास ईश्वराची भक्ती करण्याचा पूर्ण अधिकार आहे. आई–बापास संतुष्ट करण्यासाठी कोणत्याही मध्यस्थांची जरूरी नसते. त्याप्रमाणे ईश्वराची भक्ती करण्यासाठी कोणत्याही त्रयस्थ व दलालांची गरज नसते.

३) मनुष्यजातीने श्रेष्ठ नसून तो त्यांच्या कर्तृत्वाने श्रेष्ठ ठरतो.[२]

सत्यशोधक समाजाचे तत्त्वज्ञान हे महाराष्ट्रातील बहुजन समाजापर्यंत पोहचविण्याची आवश्यकता होती. सत्यशोधक समाजाचे सभासद होण्यासाठी प्रत्येकाला शपथ घ्यावी लागते. 'खंडेराव' या देवतेपुढे तळी उचलावी लागे. समाजाचे सभासदत्व सर्व जातीतील लोकांना खुले करून ठेवले होते. ब्राह्मण, महार, मांग, ज्यू आणि मुसलमान हे सुरुवातीला चळवळीचे सभासद होते.

सत्यशोधक समाजाचे पहिले अध्यक्ष म्हणून महात्मा जोतीराव फुले यांची निवड झाली. विविध ठिकाणी सत्यशोधक समाजाच्या शाखा स्थापण्यात आल्या होत्या. त्या ठिकाणी दर आठवड्याला सभा होत असत. या सभेमध्ये दारुबंदी, सक्तीचे शिक्षण, खरेदी वस्तू वापरणे या गोष्टींना प्रोत्साहन दिले जात होते. पुरोहितगिरी झुगारून लावणे, लग्ने कमी खर्चात करण्याची व्यवस्था करणे, ज्योतिष, भुते या भीतीपासून लोकांची सुटका करणे, जातिभेद, मूर्तिपूजा या गोष्टींना विरोध केला जात असे. या विषयांवर भर देण्यात आला आहे. महात्मा फुले यांनी अस्पृश्य मुलांसाठी व मुलीसाठी शाळा काढल्या. केशवपन, विधवा विवाह व पुनर्विवाह व इतर कार्ये करण्यात आली. धार्मिक व गुलामगिरी समूळ नष्ट करणे या हेतूने ही संस्था स्थापन झाली होती. पहिल्या दोन वर्षात समाजात एकूण २३२ एवढे सभासद होते. त्यानंतर ही सभासद संख्या ३१६ झाली.[३]

विद्यार्थ्यांकडून अर्ज मागवून त्यांना शिष्यवृत्ती दिली. ब्राह्मण पुरोहिताशिवाय हिंदू विवाह लावण्यात महात्मा फुले यांनी पुढाकार घेतला. अनेक विधवा विवाह व विधूर विवाह त्यांनी मोठ्या धाडसाने लावले. हे विवाह सत्यशोधक समाजाच्या पद्धतीने लावण्यात आले.

इ. स. १८७५ साली सत्यशोधक समाजाचा दुसरा वार्षिक समारंभ साजरा केला. त्यावेळी जोतीरावांनी अध्यक्षपदाची धुरा डॉ. विश्राम रामजी घोले यांच्याकडे सोपविली. या सुमारास अहमदाबाद येथे नदीला पूर आला आणि तेथील लोकांचे खूप नुकसान झाले. यावेळी सत्यशोधक समाजाच्या कार्यकर्त्यांनी निधी गोळा करून अहमदाबादला पाठविले. प्रत्येक रविवारी सत्यशोधक समाजाचे सभासद संध्याकाळी जमत असत. तत्त्वप्रचारासाठी नवीन कार्यकर्ते तयार होण्यासाठी प्रत्येक पंधरावड्यात एका शनिवारी व्याख्याने दिली जात

असत. याशिवाय वक्तृत्व कलेची शिकवण दिली जाते. याच काळामध्ये सत्यशोधक समाजाने निबंध स्पर्धा आयोजित केली होती. 'हिंदी शेतकीची सुधारणा कशी करता येईल?' हा त्या निबंधाचा विषय होता. पुण्यामध्ये सत्यशोधक समाजाने शूद्रातिशूद्र वर्गातील मुलांनी गारुड्याचा खेळ किंवा तमाशा पाहत फिरू नये म्हणून एका शिपायाची नेमणूक केली. त्या शिपायाचे काम त्या मुलांना शाळेत नेऊन बसविणे होय.

महात्मा जोतीराव फुले यांनी सार्वजनिक ठिकाणी उपदेशपर भाषणे केली. शाळेतील शिक्षकांनी उपकरणे वापरण्याबाबत मार्गदर्शन केले. गरीब ब्राह्मणेतर मुलांना मोफत शिक्षण मिळावे यासाठी त्यांनी प्रयत्न केले. इ. स. १८७६ साली एक वक्तृत्व स्पर्धा ठेवण्यात आली होती. या स्पर्धेत मूर्तिमूजा उपयुक्त आहे किंवा कसे? दुसरा विषय 'जातिभेद आवश्यक आहे किंवा कसे? असे विषय ठेवले होते. पुण्यामध्ये सत्यशोधक समाजाच्या कार्यकर्त्यांनी ग्रामीण भागात शिक्षणाचा प्रसार केला. हडपसर या गावी एक शाळा काढली. सत्यशोधक समाजाचे हडपसर हे एक मोठे केंद्र बनले. शूद्रातिशूद्र वर्गातील लोकांना पाच टक्के विद्यार्थ्यांना नि:शुल्क शिक्षण द्यावे यासाठी सत्यशोधक समाजाने प्रयत्न केला. कनिष्ठ वर्गातील गरीब मुलांसाठी वसतिगृह बांधून त्यांच्या जेवणाची व राहण्याची सोय करण्यासाठी एक समिती नेमली. या समितीमध्ये गंगाराम भाऊ म्हस्के, महात्मा जोतीराव फुले, राजन्ना लिंगू, लक्ष्मण हरी शिंदे आणि विनायकराव भांडारकर इत्यादींचा सहभाग होता.

इ. स. १८७७ साली पुणे येथे वेताळ पेठेतील सत्यशोधक समाजगृहात अनेक व्याख्याने सत्यशोधक समाजाने घडवून आणली. अशाप्रकारे जोतीराव फुले व त्यांच्या सहकाऱ्यांनी व्याख्याने, सभा, दौरे, वक्तृत्व स्पर्धा, निबंध स्पर्धा आयोजित करून सत्यशोधक समाजाचा प्रसार केला.

या सदस्यांत कृष्णराव भालेकर तरुण कार्यकर्त्यांची तडफ वेगळीच होती. महात्मा फुले यांचे क्रांतिकारक विचार बहुजन समाजापर्यंत पोहचविण्याचे कार्य प्राधान्याने भालेकरांनी केले आहे. भालेकरांना अनेक गावातून मार्गदर्शनासाठी बोलावणे येऊ लागले. ते सत्यशोधक समाजाची शाखा उघडण्यासाठी मुंबईस गेले. ज्या ठिकाणी शाखा स्थापन

झाल्यात त्या ठिकाणी उपदेशपर व्याख्यानेही दिली. बहुजन लोकांना सत्यशोधक समाजाचे महत्त्व पटवून देण्यात भालेकरांचा खूप मोठा वाटा होता. आपल्या प्रचाराद्वारे शूद्रातिशूद्रांना सत्यशोधक समाजाच्या चळवळीस पाठिंबा देण्यास विनंती केली. ब्राह्मणांच्या मानसिक गुलामगिरीतून शूद्रातिशूद्र वर्गाची सुटका करणे हे तत्त्व लोकांच्या मनावर ठसविण्याचा प्रयत्न त्यांनी केला. आपले मानवी अधिकार संपादन करुन आपली प्रगती करावी असे भालेकरांनी गरीब जनतेला तळमळीने सांगितले आहे. भालेकर हे फक्त समाजसुधारक होते असे नाही. तर त्यांचे लेखनही खूप प्रभावी होते. सत्यशोधक समाजातर्फे सुरुवातीच्या काळात निबंध स्पर्धा घेतल्या जात होत्या. त्या स्पर्धेत निबंधासाठी त्यांना बक्षिसेही मिळाली. सत्यशोधक समाजाचा पहिला वार्षिक समारंभ मोठ्या उत्साहाने पार पडला. त्यावेळी त्या सभेत भालेकरांची कार्यकारी मंडळावर निवड झाली होती. सत्यशोधक समाजाच्या तिसऱ्या वार्षिक समारंभात भालेकरांनी 'प्रिन्स ऑफ वेल्स' हा निबंध वाचला होता. इ. स. १८७५ साली नोव्हेंबर मध्ये इंग्लंडच्या युवराजांचे पुण्यास आगमन झाले. त्यावेळी भालेकरांनी युवराजांच्या सन्मानार्थ पदे गाऊन दाखविली. नाईट स्कूल म्हणजे रात्रीची शाळा. ही शाळा कशी चालते हे पाहण्याकरिता फक्त तीन महिने समाजामार्फत भालेकरांनी ही स्थापन करावी असे ठरले होते.

सत्यशोधक समाजाचे काम वेगाने चालू होते. इ. स. १८७९ मध्ये भालेकरांनी पुण्याला एका थिएटरमध्ये स्त्रियांच्या निबंध वाचनाचा समारंभ घडवून आणला. शेतकऱ्यांच्या शोषणाबद्दल भालेकर सतत लेखन करीत आले होते. इ. स. १८८० साली बारामती तालुक्यात स्वामीजी चिंचोली या गावी भालेकरांनी शेतकऱ्यांची एक प्रचंड सभा घेतली. या सभेत शेतसारा, कर्ज, जंगल त्रास, सक्तीचे शिक्षण याविषयी ठराव पास केले. हे सर्व करीत असताना भालेकर शेतीही करत होते. काही दिवसांनी शेती सोडून निरा कॅनॉलकडे राहण्यास गेले. अगोदरच दीनबंधूमुळे भालेकर कर्जबाजारी झाले. त्यामुळे सत्यशोधक समाजाकडे दुर्लक्ष झाले. यानंतर ते कंत्राटी कामाकडे वळले. विरवडी येथे इ.

स. १८८१ ते १८८३ या काळात त्यांनी निरा कॅनॉल हेडवर्कवर सबओव्हरसिअरचे काम पाहिले. या कामासाठी त्यांना सर्टिफिकेटही मिळाले.

इ. स. १९८५ मध्ये गुढीपाडव्याच्या दिवशी पुणे शहरातून सत्यशोधक झेंड्याची मिरवणूक काढण्यात आली. सत्यशोधक समाजाला आलेली मरगळ दूर करण्यासाठी भालेकरांनी या कामी पुढाकार घेतला. ही घटना भालेकरांच्या आयुष्यातील सर्वात महत्त्वाची घटना आहे. ही मिरवणूक भवानी पेठेतून विठोबाच्या देवळापासून निघाली होती. या मिरवणुकीत म. फुले, तारकुंडे, रानडे, तरवडे, गावडे, घोरपडे, गंगाराम म्हस्के यांचा सहभाग होता. पुण्याारख्या सनातन्यांच्या शहरामध्ये आपले विचार व्यक्त करण्याचे धाडस करणे म्हणजे ब्राह्मणी शक्तीला आव्हान दिल्यासारखे होते. कृष्णराव व त्यांचे भाचे गणपत सखाराम पाटील हे पुण्यातील शनिवारवाड्याच्या पुढे बाजाराच्या दिवशी लोकांच्या पुढे जाहीर भाषणे करीत. अशाप्रकारे भालेकर सत्यशोधक समाजाच्या कामाशी एकरूप झाले होते. त्याचबरोबर कंत्राटी कामाचा व्यवसाय चालू होता. इ. स. १८८७-८८ साली भालेकरांनी मुंबईच्या तान्सा तलावाच्या बांधकामाचे एक पोट कंत्राट घेतले होते. या तलावाचे पाणी सोडण्याचा समारंभ होता. हा समारंभ गव्हर्नरच्या हस्ते झाला. त्यावेळी भालेकरांनी रस्त्यावर एक सुंदर कमान उभी केली होती. त्या कमानीवर सुंदर इंग्रजी अक्षरात कोरले होते. ''मुंबईतल्या लोकांची तहान हा तलाव भागवील पण कोट्यवधी अज्ञानी जनांची ज्ञानतृष्णा तुम्ही कशी शमविणार आहात?''[४] या अर्थाचा मजकूर लिहिला होता. या पोट कंत्राटाच्या निमित्ताने भालेकर मुंबईला जात असत. गंगाराम म्हस्के व भालेकर हे दोघे चांगले मित्र होते. हे दोघेही 'डेक्कन मराठी असोसिएशन'मध्ये सहभागी झाले होते.

**वर्तमानपत्रे/नियतकालिके :**

इंग्रजी राजवटीच्या आगमनामुळे प्रशासनाच्या सोयी उपलब्ध झाल्या. शिक्षण प्रसार झाला. त्याचबरोबर मुद्रणकला अस्तित्वात आली. आणि मराठी वृत्तपत्रांचा उदय झाला. 'दर्पण', 'प्रभाकर', 'इंदूप्रकाश', 'सुबोधपत्रिका', 'ज्ञानोदय', 'विविध ज्ञानविस्तार', 'केसरी','मराठा', 'काळ', 'संदेश', 'दीनबंधू', 'दीनमित्र', 'विजयी मराठा', 'जागृती',

'राष्ट्रवीर', 'प्रबोधन', 'हंटर', 'कैवारी' ही वृत्तपत्रे प्रचार व प्रसारार्थ सुरू झाली. या वृत्तपत्रांनी तळागाळातील वर्गाचे प्रबोधन घडविण्याचे कार्य केले.

**१) दीनबंधू :**

सामान्य माणसाच्या शोषणाविरूद्ध आवाज उठविणारे आणि बहुजन समाजाच्या प्रगतीला वाहिलेला 'दीनबंधू' हे पहिले पत्र होय. हे वृत्तपत्र १ जानेवारी १८७७ रोजी भालेकरांनी सुरू केले.[५] बहुजन समाजाच्या जागृतीसाठी निघालेले हे पत्र इ. स. १८७७ ते १८८० या काळापर्यंत भालेकरांनी चालविले. शेतकरी, मजूर, कष्टकरी हे 'दीनबंधू'चे केंद्रस्थान होते. या वृत्तपत्राला कृष्णराव भालेकर, दामोदर सावळाराम यंदे, नारायण मेघाजी लोखंडे, लक्ष्मण महादेव वाघमारे, वासुदेव बिर्जे, लक्ष्मण ठोसर, बापूराव आवटे व तान्हुबाई बिर्जे या संपादकाची परंपरा लाभली.

कृष्णराव भालेकरांनी 'दीनबंधू' हे वृत्तपत्र सुरू करण्यापूर्वी 'लोककल्याणेच्छू' व 'ज्ञानचक्षू' ही दोन पत्रे भालेकर घेत असत. ही पत्रे वाचून भालेकरांना 'दीनबंधू' काढण्याची प्रेरणा मिळाली असावी. या पत्रामुळे जनतेतील पहिले संपादक होण्याचा मान भालेकरांना दिला जातो. सत्यशोधक समाजाच्या कार्याचा प्रसार करणे, शेतकरी व कामगार यांची गाऱ्हाणी मांडणे हा 'दीनबंधू'चा मुख्य हेतू होता.

'दीनबंधू' या वृत्तपत्राच्या मुखपृष्ठावर 'Journal devoted to the Interest of Working Class' असे वाक्य छापले होते.

त्याच्याखाली - "दीनबंधू हेतू सेतू व्हावेत दीन सुमिताचे।

करिता विनंती ही परसुनी खण्डन करणे त्वरीत कुमतीचे"।।

हे 'दीनबंधू' मुखपत्राचे ब्रीदवाक्य होते. या वृत्तपत्राची लांबी २० इंच व रुंदी १४ इंच होती. या वृत्तपत्राचे मजकूर इंग्रजी व मराठी होते. चिपळूणकरांच्या टीकात्मक लिखाणाला उत्तर देण्याचे प्रथम 'दीनबंधू'ने काम केले. "मालाकार यांनी आजपर्यंत आपल्या पुस्तकांत अनेक विषय प्रसिद्ध केले. पण त्यांचा झोंक चरचरीत लिहिण्याकडे असतो की जेंणें करून दुसऱ्याचा पाणउतारा व्हावा अशी त्यांची ऐट असते. जेव्हा त्यांची हुक्की तारीफ करण्याकडे

लागते तेव्हां ते त्या कलावर लिहितात... दुसरे त्यांनी (जोतिरावांनी) चित्पावनांचे उत्पत्तीविषयी लिहिलें आहे. तेव्हा आपले जाती समुदायास दोष दिलेले त्यास (मालाकारांस) सहन झाले नसतील. या विद्वान मालाकारांशी यापेक्षा असे करणे आवश्यक होतें की, फुले यांनी जे जे लिहिलें आहे ते ते स्मृतीपुराण यांचे प्रमाणांनी असत्य असे व्यक्त करून दाखविले असतें. तर त्यांची तारीफ करता आली असती... ईश्वर कृपेने या देशावर इंग्रजी राज्य झाले म्हणूनच आज पुढारी ज्ञातीशिवाय इतरांस काही तरी ज्ञान प्राप्त होऊन आपले हक्क कळू लागले आहेत. मालाकार आपले ज्ञातीचे स्वभावाप्रमाणे दीर्घदर्शी व गुप्तद्वेषी मतलबीही आहेत. इतर ज्ञातीची सुधारणा त्यांस अगदी आवडत नाही... आता मालाकार यांनी धूर्तांनी नाडलेले, दारिद्र्याने पीडलेले आणि अज्ञानांत गडलेले अशा बापड्या गरीब शूद्रांवर हत्यार धरणे म्हटले म्हणजे फारच विपरीत समजले पाहिजे.''[७] ब्राह्मणेत्तर चळवळीतील 'दीनबंधू' हे पहिले पत्र म्हणून उल्लेख केला जातो. या दृष्टीने भालेकरांचे महत्त्व अनन्यसाधारण ठरते.

पहिल्यावर्षी 'दीनबंधूला' पुणे शहरात अवघे ८ वर्गणीदार तर मुंबईमध्ये ५ एकूण १३ वर्गणीदार झाले. या तेरा जणांनी इतरांना सांगून व धैर्य देऊन वर्षाअखेरपर्यंत ८२ वर्गणीदार जमवले. १८७८ अखेर १९२, १८७९ अखेर २६० आणि १८८० चे मे महिन्यापर्यंत ३८० वर्गणीदार झाले होते.[८] यामध्ये शिफारशीचे वर्गणीदार खूप होते.

बहुजन समाजाचे पत्र सुरू करणारे पहिले पत्रकार म्हणून भालेकरांचा उल्लेख करावा लागेल. भालेकरांचे वडीलबंधू रामचंद्र भालेकर हे या पत्राचे संपादक होते. या पत्रावर संपादक म्हणून रामचंद्र भालेकरांचे नाव होते. परंतु सर्व कामकाज कृष्णराव भालेकर पाहात असत.[९]

'दीनबंधू'ने सातत्याने सत्यशोधक समाजाचा प्रसार केला. शेतकऱ्यांची आणि कंत्राटी कामावरच्या मजुरांची दैन्यवस्था इंग्रज सरकारच्या नजरेस आणण्याचे महत्त्वपूर्ण कार्य या पत्राने केले. त्या दृष्टीने भालेकरांची डेक्कन ॲग्रिकल्चरिट्स रिलीफ ॲक्ट' विषयक भूमिका अत्यंत लक्षणीय होती. शेतकऱ्यांच्या हक्कांचे व हिताचे रक्षण करण्यासाठी इंग्रज

सरकारने इ. स. १८७९ साली त्यात काही तरतुदी केल्या. सावकार, भटभिक्षुक, कुलकर्णी आणि इतर सरकारी नोकर हे लहान शेतकऱ्यांची पिळवणूक करतात. हे शेतकरी सुसंघटीत होऊन स्वावलंबी बनले तर ते गुलामगिरीतून मुक्त होतील हे भालेकरांनी दीनबंधूतून आग्रहाने मांडले आहे.

वरील निर्बंधाबाबत 'दीनबंधू'ने आपले विचार व्यक्त करताना, "ब्राह्मणांनी चालविलेल्या वृत्तपत्रांनी या शेतकऱ्यांच्या दु:ख निवारण्याच्या कायद्याविरूद्ध ओरड केली आहे. कारण या कायद्याच्या अंमलबजावणीमुळे ब्राह्मण सावकारांचाच तोटा होणार आहे. यास्तव सरकारने या ब्राह्मण पत्रकारांच्या निषेधाची पर्वा करू नये. इतकेच नव्हे तर, हा कायदा सर्व बाबतीत कृतीत उतरला आहे किंवा नाही हे पाहण्यासाठी आणखी एक मंडळ नेमावे,"[१०] अशी मागणी केली.

भालेकरांनी 'दीनबंधू'तून हितोपदेश नावाचे भजनी अभंग प्रसिद्ध केले. शूद्रातिशूद्रांच्या अवनतीचे मुख्य कारण अज्ञान आहे, असे त्यांनी बजावले आहे. 'विद्या' व 'उद्योग' या दोन शस्त्रांच्या साहाय्याने ब्राह्मणाच्या कसबाला तोंड देता येईल, हे भालेकरांनी 'हितोपदेश'मधून मांडले आहे. त्याचबरोबर प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत असावे असा त्यांनी आग्रह धरला आहे. शिक्षणाची आवश्यकता व महत्त्व पटवून देणारे लेख प्रसिद्ध केले आहेत. बहुजन समाजाला जागृत करण्यासाठी या पत्राने सातत्याने प्रयत्न केला. शिक्षण प्रसारासाठी आग्रही भूमिका दुसऱ्या कोणत्याही वृत्तपत्राने घेतली नाही. शेतकरी, मजूर, कष्टकरी हे या पत्राचे मुख्य विषय होते. त्यांचे हित, कल्याण व उत्कर्ष जपण्याची काळजी 'दीनबंधू'ने सदैव घेतली. संपादकीय पानावर शिक्षणासंबंधीचा श्लोक छापला आहे.

"अज्ञाने महिमजि दीन अवघे सर्वोपरि गांजले।
विद्याधर्म तया न सेव्य म्हणून स्वार्थी बहु माजले ।।
धूर्ताहि मनी मत्सरास धरूनि अशी दुर्दशा।
जाणोनी बहुमान योग्य करूनि विद्येप्रति व्हा वशा ।।"

असे शिक्षणासाठी आवाहन केले आहे.

याचवेळी 'दीनबंधू'ने प्रार्थना समाजावर कडक टीका केली आहे. यात, ''प्रार्थना समाजाच्या पुढाऱ्यांना गरीब वर्गांमध्ये शिक्षण प्रसार करण्याची इच्छा नाही; ते गरिबांच्या हक्कांचे रक्षण करण्याविषयी चकार शब्दही काढीत नाहीत. प्रार्थना समाज ही स्भा आमच्यामते केवळ मतलबसिंधु समाज आहे'' [११] अशा दीनबंधूची प्रार्थना समाजाविरूद्ध आवाज उठविला. कनिष्ठ वर्गांना तांत्रिक शिक्षण द्या, ज्या जातिभेदाने हिंदुस्थानचा नाश केला आहे त्या जातिभेदाला मूठमाती देऊन हिंदुस्थानचे पुनरूज्जीवन करता येईल, असे नम्र मत मांडले आहे. त्याचबरोबर महात्मा फुले यांनी 'शेतकऱ्यांचा आसूड' नावाचा निबंध लिहिला. त्या निबंधाचे पहिले दोन भाग छापून ते सरकारी अधिकाऱ्यांच्या नजरेस आणले. जोतीरावांचे लेख, अखंड प्रकाशित झाले. देवदासीची प्रथा कायद्याने बंद होण्यासाठी 'दीनबंधू'तील लेखमालेने प्रयत्न केला आहे.[१२]

नारायण मेघाजी लोखंडे यांच्या मृत्यूनंतर इ. स. १९०७ मध्ये हे लक्ष्मण वाघमारे नावाच्या सहकाऱ्याने ते पत्र वर्षभर चालविले. याच काळात विजयादशमीच्या दिवशी मुंबईहून वासुदेव बिर्जे बंद पडलेला 'दीनबंधू' पुन्हा सुरु केला. त्यांच्या मृत्यूनंतर तानुबाई बिर्जे यांनी हे वृत्तपत्र चालविले. भारतातील पहिल्या महिला संपादक म्हणून तानुबाई ब्रिर्जे यांचा उल्लेख केला जातो.[१३]

## २) दीनमित्र :

कृष्णराव भालेकरांनी गणपत सखाराम पाटील यांच्या मदतीने पुण्याला इ. स. १८८८ मध्ये 'दीनमित्र' मासिक सुरू केले.[१४] या मासिकाच्या पृष्ठभागावर 'जे का रंजले गांजले' हा अभंग छापला आहे. याची किंमत दोन आणे व वार्षिक वर्गणी एक रुपया होता.

'दीनमित्र' हा अज्ञानी, दीन व दुबळ्यांचा मित्र होता. 'दीनमित्र म्हणजे विद्या, धन, अधिकार यावाचून ज्यांची अवस्था दीनावस्था झाली आहे.'[१५] अशाचा मित्र अज्ञानांध कोंडून ठेवलेल्या कोट्यावधी बांधवास ज्ञान सूर्याचा प्रकाश दाखवावा या हेतूने मासिक सुरू केले. 'दीनमित्र' हे सुरुवातीला मासिक होते. त्यानंतर काही दिवसांनी त्याचे रूपांतर साप्ताहिकात केले. पण ते बंद करून मासिकच चालू ठेवले. या पत्रातून भालेकरांनी अनेक

लेख लिहिले. यातून रचना, श्रीखंड, पोवाडे व लावणी प्रसिद्ध केल्या आहेत. 'दीनमित्र'मधील लेखन शेतकऱ्यांना उद्देशून होते. 'बळीबा पाटील' या कादंबरीची चार प्रकरणे 'दीनमित्रा'तून एप्रिल १८८८ ते जुलै १८८८ या अंकातून प्रसिद्ध केली आहेत. त्याचे प्रकाशन अनियमित होते त्याचे ९, १०, ११, १२ हे जोडअंक एकत्र काढले होते. हे पत्र अंबाखाना छापखान्यातून छापले जात होते.

गणपत सखाराम पाटील यांचे निधन झाल्यानंतर हे वृत्तपत्र भालेकरांनी चालविले होते. त्यानंतर हे मासिक १८९१ साली अहमदनगर येथे प्रसिद्ध होऊ लागले. मुकूंदराव पाटील यांनी साप्ताहिक स्वरूपात सोमठाणे, जि. अहमदनगर येथे २३-११-१८९० पासून सुरू केले. सत्यशोधक समाजाची जुनी वृत्तपत्रे म्हणून 'दीनबंधू' व 'दीनमित्र'चा उल्लेख केला जातो. याचे आद्यजनक व संपादक म्हणून भालेकर यांना मानाचे अग्रस्थान दिले आहे.[१६]

या पत्राचे अंक प्रत्येक बुधवारी निघत असत. पत्राच्या पहिल्या पानावर 'कै. कृष्णराव भालेकर यांचे स्मरणार्थ' असे छापले होते. या पत्राची किंमत ३ आणे होती. प्रत्येक अंकात जास्तीत जास्त ६ पाने होती.

''ज्याशी दु:खानी गांजिले। तोचि सोयरे आपुले। ठेवी मुक्तीला गहाण।

काठी तयाकरिता ऋण। तोचि दीनांचा कैवारी। दीनमानी देवापरी।।''

'दीनमित्र' मधून धर्मगुरुची वृत्ती सुधारावी म्हणून धर्मगुरु म्हणविणाऱ्यास ताकीद, शेतकऱ्यांनी सावध व्हावे म्हणून शेतकऱ्यास इशारा, शूद्रातिशूद्रांना न्याय मिळावा म्हणून सरकारास सूचना, नाट्यरुप संवाद, वर्तमानसार इ. मजकूर प्रसिद्ध केले. लेखाशी संबंधित प्रत्येक अंकात चित्र आणि एक सुंदर कविता असायची. अनेक कररूपी जळवा लागलेला शेतकरी, शेतकऱ्यांच्या घरात व्याजरूपी कर्जाचे, उंटाचे पिल्लू, शेतकऱ्यांच्या मानेवर सरकारी अधिकारी, सावकार व भारवाला बसलेला आहे अशी चित्रे 'दीनबंधू'तून प्रसिद्ध केली आहेत.[१७]

### ३) अंबालहरी :

बहुजन समाजाची सुधारणा करावी या उद्देशाने पुण्यात एखादे नवीन साप्ताहिक सुरू करावे, असा विचारविनिमय भालेकर, ह. ना. नवलकर व गणपतराव सखाराम पाटील यांच्यात झाला. हे वृत्तपत्र सुरू केले त्यावेळी अंबाप्रसाद छापखान्यातून 'दीनमित्र' छापला जात होता. या छापखान्याचे मालक नारायण अंबाजी वंजारी होते. भालेकर या वृत्तपत्रातून लिखाणाचे काम करत होते.[१८] सुरू झालेल्या या पत्राचे 'अंबालहरी' असे ठेवण्यात आले. हे इंग्रजी व मराठी साप्ताहिक होते.

या वृत्तपत्राच्या पहिल्या पानावर इंग्रजी लेख आले आहेत. त्यामध्ये अग्रलेख, इंग्लिश संपादकीय लेख येत असत. हे इंग्रजी मराठी साप्ताहिक होते. नारायण रघुनाथ नवलकर हे इंग्रजी लिखाण करीत असत. या पत्राच्या दुसऱ्या व तिसऱ्या पानावर मराठी लेख येतात. अंबालहरीतील लिखाणाचा सर्वाधिक भर प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत व्हावे यावर होता. इ. स. १८८९ मध्ये विजयादशमीपासून प्रत्येक मंगळवारी अंबालहरी प्रकाशित होत असे. अंबालहरीतील विशेष लिखाणामुळे ते लोकप्रिय झाले. काही काळानंतर ते बंद पडले. 'अंबाप्रसाद' हे सत्यशोधक समाजाचे पत्र होते. या पत्राशी भालेकरांचा अगदी निकटचा संबंध होता.[१६]

### ४) शेतकऱ्यांचा कैवारी :

'शेतकऱ्यांचा कैवारी' हे पत्र चालविण्यात भालेकरांचा खूप मोठा वाटा आहे. हे पत्र दामोदर सावळाराम यंदे व रामजी संतुजी आवटे यांच्या सहकार्याने इ. स. १८८१ मध्ये मुंबई येथे सुरू केले होते. या पत्रात मागासलेल्या शेतकरी वर्गाची सुधारणा व्हावी. या हेतूने 'शेतकऱ्यांचे कैवारी' हे पाक्षिक सुरू केले. काही काळानंतर पाक्षिक बंद पडले हे सयाजीराव गायकवाडांना समजले. तेव्हा त्यांनी आवटे व यंदे यांना बोलावून नवीन वृत्तपत्र सुरू केले. याविषयी चर्चा केली. अशा रीतीने भालेकरांच्या संपादकात्वाखाली इ. स. १८९३ मध्ये 'शेतकऱ्यांचे कैवारी' हे वृत्तपत्र सुरू झाले. भालेकरांच्या जोडीला वासुदेव बिर्जे होते. हे पत्र दोन वर्ष चालले.

या पत्रावर "The advocate of the Agriculturists'[२०] हे इंग्रजी नाव छापले आहे. यातून प्रत्येक शुक्रवारी लेख छापून येत असत. निवडक बातमीपत्रे, वर्तमानसार, वाचकांचा पत्रव्यवहार इ. मजकूर येत असे. शेतकऱ्यांच्या समस्या मांडल्या जात होत्या. शेतकरी सुखी व सुशिक्षित करणे या हेतूने पत्र सुरू झाले होते. अज्ञानी शेतकऱ्यांचे शोषण व दारिद्र्याची चित्रे, 'शेतकऱ्यांचा कैवारी'मधून प्रसिद्ध केले. शेतकरी गाढा ओढीत आहे, हे 'राज्यशकट' चित्रातून छापले आहे. शेतकऱ्यांच्या गाड्या सरकारी वेठीस धरल्यामुळे त्यांची दैना कशी उडते याचे चित्रण 'राघू गाडीवाना'चा पोवाड्यातून उभे केले आहे. याचे चित्र छापून हजारो प्रति वाटल्या. वृत्तपत्राच्या मुखपृष्ठावर ''भारतभूमी आपद्ग्रस्त झाली असून, तिची मुले अनेक आपत्ती भोगीत आहे. त्यातल्या त्यात शेतकऱ्यांची स्थिती खूपच हलाखीची झालेली असून, त्यांची उन्नती करण्याचा विचार बुद्धिमान शहाण्या मंडळींनी केला पाहिजे.''[२१] या ओळी छापलेल्या आहेत. शेतकऱ्यांची सुधारणा व्हावी म्हणून भालेकरांनी या पत्रातून उपाय सुचविले आहेत. अशाप्रकारे भालेकरांनी चौफेर लेखन केले आहे.

**५) राघवभूषण :**

इ. स. १९८८ च्या सुमारास सत्यशोधक समाजाच्या चळवळीचा प्रसार करणारे 'राघवभूषण' नावाचे साप्ताहिक सुरू झाले. हे साप्ताहिक नाशिक, जि. येवले येथून प्रसिद्ध होऊ लागले. याचे संपादक गुलाबसिंह कौशल्य होते. या पत्रातून शेतकऱ्यांच्या गाड्या, सरकार, वेठबिगारीसाठी धरून नेतात. शेतकऱ्यांवर पोलिस अन्याय कसा करतात हे भालेकरांनी 'शेतकऱ्यांचा कैवारी'मधून प्रसिद्ध केले. म्हणून भालेकरांना पोलिसांनी पकडून पुराव्याची मागणी केली. यावेळी राघवभूषण प्रसिद्ध झाले. भालेकरांच्या चित्राप्रमाणे हुबेहूब आमच्या छापखान्यापुढे गाडीच्या धराधरीचा देखावा पाहण्यात आला. तोच पुरावा भालेकरांनी दिला आहे.[२२] 'दीनबंधू' व 'शेतकऱ्यांचा कैवारी' या पत्राचे संपादक म्हणून भालेकर काम पाहत होते. तर 'दीनमित्र' व 'अंबालहरी' यातून त्यांनी साहित्य प्रसिद्ध केले तर 'सत्यप्रकाश' हे वृत्तपत्र भालेकरांना इच्छा असूनही काढता आले नाही. मराठी वृत्तपत्राच्या दृष्टीने भालेकरांचे कार्य अनन्यसाधारण ठरते.

**सारांश :**

'दीनबंधू', 'दीनमित्र' व 'शेतकऱ्यांचा कैवारी' या पत्राचे भालेकरांनी संपादन केले. बहुजन समाजाच्या शोषणाविरूद्ध आवाज उठविणारे १ जाने. १८७७ रोजी भालेकरांनी पहिले पत्र सुरू केले. 'दीनबंधू'चे पहिले संपादक भालेकर होते. शेतकरी, मजूर, कष्टकरी हे 'दीनबंधू'चे मुख्य विषय होते. त्यांची गाऱ्हाणी मांडणे हा 'दीनबंधू'चा प्रमुख उद्देश होता. दुसरे पत्र 'दीनमित्र' गणपत पाटील यांच्या साहाय्याने इ. स. १९८८ साली सुरू केले. अज्ञानी व दीनदुबळ्यांचा मित्र होता. अज्ञानी लोकांना ज्ञानाचा प्रकाश दाखवावा या हेतूने मासिक सुरू केले. बहुजन समाजाची सुधारणा करावी. या हेतूने 'अंबालहरी' इ. स. १८८९ मध्ये सुरू झाले. हे पत्र सुरू करण्यामागे भालेकरांचा खूप मोठा वाटा होता. 'शेतकऱ्यांचा कैवारी' हे पत्र इ. स. १८९३ मध्ये भालेकरांच्या संपादकत्वाखाली सुरू झाले. मागासलेल्या शेतकरी वर्गाची सुधारणा व्हावी म्हणून हे पत्र चालू केले. यानंतर सत्यशोधक समाजाच्या चळवळीचा प्रसार करणारे 'राघवभूषण' नावाचे पत्र निघाले. हे पत्र इ. स. १८८८ साली सुरू झाले. या पत्रातून शेतकऱ्याच्या गाड्या सरकार वेठबिगारीसाठी धरून नेतात. शेतकऱ्यावर पोलीस कसा अन्याय करतात याचा पुरावा देण्यासाठी 'राघवभूषण' या पत्राच भालेकरांनी उपयोग केला पाहिजे. पहिले बहुजन समाजाचे पत्र सुरू करण्याचे श्रेय भालेकरांना दिले जाते.

**१) सुशिक्षणगृह :**

कृष्णराव भालेकरांनी 'सुशिक्षणगृह' सुरू केले. खेड्यातील अज्ञानी शेतकऱ्यांची मुले अनेक कारणांमुळे शाळेत जात नाहीत. या उद्देशाने प्रत्येक तालुक्याला एक बोर्डिंग असावे म्हणून भालेकरांनी 'सुशिक्षणगृह' पुणे पेठ कसबा येथे स्थापन केले. व्यापार किंवा नोकरीच्या निमित्ताने फिरण्यात दिवस काढणाऱ्यांस व खेड्यातील पाटील, देशमुख, इमानदार वगैरे लोकांना आपल्या मुलांकडे लक्ष देता येत नाही. म्हणून आपल्या मुलांची रात्रंदिवस खबरदारी ठेवून विद्या शिकता यावी.[२३] या हेतूने 'सुशिक्षणगृह' चालू झाले होते.

या 'सुशिक्षणगृहात' विद्यार्थ्यांनी भोजन करावे व पुण्यातील वेगवेगळ्या शाळेत जाऊन अभ्यास करावा. शाळा सुटल्यावर विद्यार्थ्यांनी सुशिक्षणगृहात यावे. जेवण उरकून मास्तरांनी दिलेला अभ्यास करून नंतर निद्रा घ्यावी. अशी तरतूद या बोर्डिंगमध्ये केली होती. या 'सुशिक्षणगृहाची' भालेकरांबरोबर विश्राम घोले, गंगाराम म्हस्के हे वरचेवर येऊन मुलांची व्यवस्था पाहत असत. भालेकरांनी सुशिक्षणगृहासाठी काही नियम बनविले आहेत.

## २) 'दीनबंधू सार्वजनिक सभा' :

'दीनबंधू सार्वजनिक सभा' या नावाची संस्था कृष्णराव भालेकरांनी स्थापन केली.[२४] या संस्थेचे प्रमुख संस्थापक भालेकर होते. रा. ब. विठ्ठलराव वंडेकर, तारकुंडे, गुणवरे, सरदार, हरि रावजी चिपळूणकर, बंडोबा तरवडे, हरिश्चंद्र नवलकर, साईवाले घोरपडे बंधू इ. सहकाऱ्यांच्या मदतीने भालेकरांनी ही संस्था स्थापन केली. ही सभा स्थापन करण्यापूर्वी पुण्यात सुशिक्षित वर्गांनी 'सार्वजनिक सभा' स्थापन केली होती. परंतु या सभेमध्ये गोरगरिबांचा विचार केला जात नसे. याची भालेकरांना खात्री झाली. म्हणून भालेकरांनी 'दीनबंधू सार्वजनिक सभे'ची स्थापना केली.

या सभेचे अध्यक्ष रा. रा. लक्ष्मणराव कृष्णराव घोरपडे हे होते. ही सभा प्रत्येक रविवारी डॉ. सदोबा गावडे यांच्या वाड्यात भरत असे. गोरगरीब जनतेची गाऱ्हाणी सरकारपुढे मांडणे, अडाणी जनतेसाठी शिक्षणाचा प्रसार करणे, अज्ञानी जनतेतील वाईट चाली बंद करणे या उद्देशाने ही सभा स्थापन झाली होती. दीनबंधू सार्वजनिक सभेत सर्वांना मोफत व सक्तीचे शिक्षण मिळावे यावर अधिक भर होता. या सभेत राजकीय कामे करण्याचे श्रेय भालेकरांना दिले जाते.

## ३) दीनबंधू फ्री स्कूल :

भालेकरांनी सीताराम तारकुंडे व त्यांचे भाचे गणपत पाटील यांच्या मदतीने 'दीनबंधू फ्री स्कूल' सुरू केले.[२५] बहुजन समाजातील अज्ञानी, अशिक्षित शेतकऱ्यांच्या मुला-मुलींना शिक्षण मिळावे या उद्देशाने 'दीनबंधू फ्री स्कूल' सुरू केले. न्या. रानडे यांच्या साहाय्याने शाळा रजिस्टर झाली. शाळा खात्याचे डेप्युटी असिस्टंट यांनी शाळेची परीक्षा घेतली.

शाळेतील शिक्षण, स्वच्छता व टापटीप पाहून चांगला अभिप्राय दिला. ब्राह्मणेतर लोकांसाठी शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी भालेकरांनी हा वेगळाच प्रयत्न केला होता. सर्वांच्या मताने मुलांकडून फी वगैरे न घेता हे स्कूल सुरू केले. ही शाळा भरविण्यासाठी पुण्यातील शुक्रवार पेठेमधील कनवाळे यांचा वाडा भाड्याने घेतला. शाळेची व्यवस्था पाहण्यासाठी एक समिती नेमली. या समितीमध्ये न्या. रानडे, गोपाळराव देशमुख, रा. ब. नारायण दांडेकर, मार्केटमधील दलाल शिवराम घायरकर व कोंडिबा टिकेकर यांनी या समितीचे काम पाहिले. शाळेला सरकारकडून विशेष मदत मिळावी म्हणून भालेकरांनी खूप प्रयत्न केले.

इ. स. १८८९ मध्ये प्रिन्स ऑफ वेल्स हे हिंदुस्थानच्या दौऱ्यावर आले होते. त्यावेळी भालेकरांनी आपल्या 'फ्री स्कूल'मधील विद्यार्थी त्यांच्या स्वागतासाठी उभे केले होते. त्यावेळी त्याच्या हातात एक फलक होता. त्यावर इंग्रजीमध्ये सोनेरी अक्षरे कोरली होती.

"Welcome tell your Grandmama
We are happy Nation but nineteen crores
are without education"[२६]
''आपल्या आजीला सांगा आम्ही सुखी आहोत –
तथापि एकोणीस कोटी शिक्षणाशिवाय आहोत''.

ही मोहीम भालेकरांनी हाती घेतली. याचा अर्थ हिंदुस्थानातील ९५% लोक निरक्षर आहेत. हे राजपुत्र व म्हाताऱ्या राणीच्या निदर्शनास आणण्यासाठी भालेकरांनी हे काम केले. बहुजनांना प्राथमिक शिक्षणाचा लाभ मिळाला पाहिजे. हा उद्देश त्या पाठीमागे असावा.

आपल्या मतांची आणि गाऱ्हाण्यांची जाणीव राष्ट्रीय सभेस व्हावी म्हणून इ. स. १८९५ साली भालेकरांनी राष्ट्रीय सभेच्या मंडपासमोर एक मोठा मांडव घातला. त्या मंडपाच्या दारासमोर २२ फूट उंचीचा शेतकऱ्याचा कापडी पुतळा उभा केला होता. त्या

पुतळ्याच्या हातात एक लाल फडक्याचा मोठा फलक दिला होता. त्यावर सोनेरी अक्षरात राष्ट्रीय सभेला जाब विचारला होता.

''आऊट ऑफ अवर नाइन्टिन कोअर्स आर देअर नाइन्टिन टू इक्सप्लेन अवर ग्रीव्हन्सेस?''.[२७]

या पुतळ्यामुळे देशात प्रचंड खळबळ उडाली. हा पुतळा शेतकऱ्यांचे दारिद्र्य व दु:ख यांची जाणीव करून तो देत होता. ही भालेकरांची पुतळा उभारण्यामागे भूमिका होती.

हे सर्व करत असताना भालेकरांनी सत्यशोधक समाजाचे काम थांबवले नव्हते. जबलपुरात असताना करजगाव वगैरे वऱ्हाड प्रांतात त्यांनी सत्यशोधक समाजाचा प्रसार केला. इ. स. १९०० साली ओतूरच्या शास्त्री नारोबाबाजी महाघट आणि शास्त्री धर्माजी रामजी डुंबरे या दोघांनी सत्यशोधक समाजाचे काम वऱ्हाडात जाऊन सुरू केले होते. करजगाव येथे सत्यशोधक समाज स्थापन केला. यावेळी भालेकरांनी समाजाचे काम अधिक विस्तृत करण्याचे कार्य केले. याच काळामध्ये करजगाव येथे केलेली व्याख्याने ही भालेकरांची सर्वात महत्त्वाची कामगिरी होय. एक व्याख्यान धर्मविषयक तर दुसरे गरीब शेतकऱ्यांनी एकत्र येऊन शेतीमालाशी निगडीत असे कारखाने काढण्याबाबत होते. त्यांच्या वक्तृत्वाच्या प्रभावामुळे जिनिंग कंपनी स्थापन झाली.

इ. स. १९०७ च्या सुमारास त्यांनी अहमदनगरला थिएटरमध्ये नोकरी करीत होते. यावेळी पंपात सुधारणा करण्याचे काम सुरू होते. अशा प्रतिकूल परिस्थितीमध्ये भालेकरांचे वाचन, लेखन व पत्रव्यवहार चालू होते. इ. स. १९०८ मध्ये भालेकर विठ्ठल रामजी शिंदे यांनी 'डिप्रेस्ड क्लासेस मिशन' सुरू केली होती. या मिशनचा महाराष्ट्रात ठिकठिकाणी प्रचार करण्यामध्ये भालेकरांचा मोठा सहभाग होता. हे अनुभवी प्रचारक व उत्तम कार्यकर्ते होते. म्हणून विठ्ठल रामजी शिंदे यांनी त्यांचे कौतुक केले होते. भालेकरांनी जानोजी बोर्डिंगचे काम ८ महिने केले होते. दर आठवड्याला बॅरिस्टर होसाली यांना भालेकर रिपोर्ट सादर करत असत.

**चित्रे :**

अज्ञानी, अशिक्षित शेतकऱ्यांना त्यांच्या सत्यस्थितीचे दर्शन घडविण्यासाठी भालेकरांनी 'चित्र' या प्रभावी माध्यमांचा वापर केला आहे. या चित्राद्वारे शेतकऱ्यावर होणाऱ्या अन्यायाला, जुलमाला वाचा फोडण्याचे विचार मांडले आहेत. शेतकऱ्यांचे शोषण करणाऱ्या सरकारच्या जुलमी वृत्तीवर प्रकाश टाकण्याचे त्यांनी कार्य केले. यासाठी 'राघू गाडीवाना'च्या चित्राची एक मालिका भालेकरांनी प्रसिद्ध केली. 'व्याजाचा उंट', 'शेतकऱ्यांचा देखावा', 'गावगाडा' ही एकूण चार दर्दभरी चित्रे प्रकाशित केली. शेतकऱ्यांचे करुण व दु:खपूर्ण जीवनाचे दर्शन या चित्रांमधून व्यक्त केले आहे.

**१) 'राघू गाडीवाना'चे चित्र :**

शेतकऱ्याच्या दु:खस्थितीचे यथार्थ दर्शन घडविण्यासाठी 'राघू गाडीवाना'चे चित्र भालेकरांनी प्रसिद्ध केले. या पहिल्या चित्रात राघू गाडीवान धान्य घेऊन जात आहे. दुसऱ्या चित्रात राघूच्या गाडीत धान्य ठासून भरलेले आहे. त्या गाडीमध्ये मावत नाही तर ते खाली पडत आहे. तिसऱ्या चित्रात वजनामुळे बैल खाली बसला आहे. बैलाला उठवित असताना इंग्रजी शिपाई दाखविलेला आहे. चौथ्या चित्रात गाडीचा प्रवास सुरू झाल्याचे दिसते. पाचव्या चित्रात रिकामी गाडी पकडणारे व राघूला मारहाण करताना शिपाई दिसतात. तर सहाव्या चित्रात गाडीसमोर रडत बसलेला राघू दिसतो. याशिवाय सातव्या चित्रात इंग्रजी अधिकाऱ्याचे सामान वाहून नेणारी गाडी होती. शेवटी आठव्या चित्रात गाडी चालविणाऱ्या राघूला मारणारे इंग्रज शिपाई दाखविलेले आहेत.[२८] असे हृदयद्रावक दर्शन भालेकरांनी या चित्रांतून उत्कृष्टपणे घडविले आहे.

**२) शेतकऱ्याचा देखावा :**

इ. स. १८९६ साली 'शेतकऱ्याचा देखावा' हे चित्र भालेकरांनी प्रकाशित केले होते. या चित्रामध्ये एक मोठे झाड आहे. या झाडाच्या प्रत्येक फांदीवर भारतातील सर्व प्रदेश व प्रांतातल्या शेतकऱ्यांची १८१ चित्रे काढली होती. दारिद्र्य व अज्ञान यामुळे शेतकरी वैतागून गेला होता. हे चित्र 'समजूतदार शेतकऱ्यांचे उद्‌गार' या शिर्षकाखाली काढले होते. या

चित्रामध्ये शेतकरी जो ऐंशी कोटी रुपये कर सरकारला देतात. यातूनच देशातील रखवालदार व हिशेब ठेवणाऱ्यांना पगार, पेन्शन आणि इनाम दिले जाते. पण शेतकऱ्यावर जर आपत्ती कोसळली तर सरकार त्यांना मदत करीत नाही. शेतकरी त्यांच्या जनावरांवर प्रेम करतात. तेवढेसुद्धा प्रेम सरकारी कामगार शेतकऱ्यांवर करत नाही. असे करांच्या ओझ्याने वाकलेल्या शेतकऱ्याचे वर्णन भालेकरांनी केले आहे. शेतकरी हा झाडाच्या बुंध्याला खेटून उभा राहिलेला आहे. तो ओरडून वेगवेगळ्या करांची नावे व आकडे सांगत आहे. त्याचबरोबर धर्मगुरुही त्या चित्रात उभा आहे. तसेच दारिद्र्य व अज्ञानाचे वाघ, सिंह शेतकऱ्यांच्या मागे हात धुवून लागले. त्याचबरोबर पुरोहित वर्गाने पिडले आहे. या चित्रामध्ये शेतकऱ्याच्या डोक्यावर एक मोठी पेटी दिलेली आहे. त्या पेटीवर करांची नावे आणि आकडे दिले आहेत. हे चित्र काढून भालेकरांनी शेतकऱ्यांच्या दारिद्र्य व अज्ञानावर प्रकाश टाकला आहे.

**३) गावगाडा :**

कृष्णराव भालेकरांनी 'गावगाडा' हे चित्र अत्यंत सुंदर काढले आहे. 'दीनमित्र' या वर्तमानपत्रातून महिन्याला, आठवड्यातल्या अंकाबरोबर एक चित्र देत असत. 'गावगाडा' कसा चालतो हे दाखविणारे एक उत्कृष्ट चित्र भालेकरांनी प्रकाशित केले होते.[३०] या चित्रात एक सुंदर व नक्षीदार रुप्याचा रथ दाखविला होता. या रथाला दोन मजले होते. त्यापैकी वरच्या मजल्यात ऐषआरामाची आणि सुखोपभोगाच्या वस्तूंची मजा लुटणाऱ्यांची रेलचेल होती व त्या मजल्यात युरोपियन लोक बसले होते. या रथामध्ये खालच्या मजल्यावर डोक्याला जरीच्या पदराच्या रेशमी पगड्या, उपरणे घेतलेले अंमलदार होते. त्याचबरोबर शुभ्र कोट, धोतर व अंगावर स्वच्छ उपरणे घेतलेले ब्राह्मण व अंमलदार बसले होते. खालच्या मजल्यावर सर्वच ब्राह्मण लोक बसले नव्हते तर शंभर ब्राह्मण, दोनतीन पारशी व एकच मुसलमान होता. या रथातील युरोपियन लोकांप्रमाणेच गाद्या, गिरद्या, पंखे, पिवळ्या, तांबड्या रंगाच्या लावलेल्या हंड्या व खाण्या-पिण्याच्या पदार्थांची चंगळ होती. या रथाची चाके रुप्याची होती व याला सुवर्णाचा कळस होता. मोठ्या हमरस्त्याने हा रथ चालला होता. हा सुंदर, देखणा रथ ओढण्यास देखणे व पाणीदार घोडे जुंपलेले नव्हते तर तो रथ

अज्ञानी शेतकरी ओढत होते. या शेतकऱ्यांचा पोशाख डोक्यास फाटके, रकटे पागोटे व लंगोटी नेसलेले असा होता. रथ हाकण्यास पाटील व कुलकर्णी हे सारथी होते. या लोकांना शेतकरी अत्यंत काकुळतीने म्हणत, ''दादा हो तुम्ही रात्रंदिवस पाहात! आम्हास पोटभर खावयास नाही. हा रथ ओढून ओढून आम्ही मोठ्या मेटाकुटीस आलो आहोत. तुमच्या सारखे लबाड लोक या दुनियेत नाहीत. बऱ्या बोलाने रथ ओढा, नाहीतर मग तुम्हाला चाबकाचे चांगलेच तडाखे बसतील.''[२९] अशी चित्रे देऊन भालेकरांनी निरक्षर शेतकऱ्यांत जागृती निर्माण केली आहे.

**४) व्याजाचा उंट :**

'व्याजाचा उंट' हे भालेकरांचे प्रसिद्ध चित्र आहे.[३०] या चित्रामध्ये एका गरीब शेतकऱ्याची झोपडी दाखविली आहे. या झोपडीमध्ये एक व्याजरूपी उंट उभा असल्याचे दिसत आहे. यामध्ये सरकारी बेलीफ व सावकार उभे आहेत. गरीब शेतकऱ्यांच्या झोपडीतील भांडीकुंडी व इतर सामान अस्ताव्यस्त पडलेले दिसत आहे. तो गरीब शेतकरी सावकाराच्या पाया पडत आहे. बाजूला शेतकऱ्याची बायको उभी आहे. एक वृद्ध म्हातारी संसाराची झालेली वाताहत पाहून रडत आहे. कावरेबावरे झालेले लहान मूल बापाच्या कमरेस मिठी मारत आहे. सावकार मनातल्या मनात खदखदून शेतकऱ्यांच्या संसाराचा बाजार मांडत आहे. या चित्रातील प्रत्येक गोष्टींना 'व्याजाचा उंट' हा जबाबदार आहे. कारण शेतकरी जे कर्ज घेतो, त्या कर्जावरील व्याजाचे पिलू वाढतच जाते. या कर्जातून शेतकऱ्यांची सुटका होत नाही. उलट त्याचे सर्व घरदार देशोधडीला लागते. सर्व आयुष्य उद्ध्वस्त होऊन शेतकरी जीवनातून उठतो. हे भालेकरांनी मार्मिक चित्रातून दाखविले आहे. चांगला फोटोग्राफ किंवा चांगले चित्र हजार शब्दांपेक्षा चांगले असते. चांगल्या चित्रामुळे मजकुराच्या आकर्षकतेत भर पडते.[३१] हे भालेकरांनी शेतकऱ्यांच्या दुरावस्थेचे बोलके दर्शन चित्राद्वारे घडविले आहे.

**सारांश :**

कृष्णराव भालेकरांनी 'चित्र' या प्रभावी साधनांचा वापर करून शेतकऱ्यांच्या दारुण स्थितीवर प्रकाश टाकला आहे. शेतकऱ्यांच्या दु:खपूर्ण जीवनाचे यथार्थ दर्शन 'राघु गाडीवाना'च्या चित्रामधून आले आहे. तर अडाणी, अशिक्षित शेतकऱ्यांना जागृत करण्यासाठी 'शेतकऱ्याचा देखावा' हे चित्र काढले. तर 'गावगाडा'मधून शेतकऱ्यांचे आर्थिक शोषण झाले आहे. शेतकऱ्यांच्या जीवावर पाटील, सावकार, पुरोहित वर्ग व सरकारी अंमलदार जगत आहेत. याचे दर्दभरी चित्र भालेकरांनी प्रकाशित केले आहे. सावकाराकडून कर्ज घेतल्यामुळे शेतकऱ्याच्या दुरावस्थेचे बोलके चित्र काढले. हे भालेकरांनी 'व्याजाचा उंट' चित्रातून दाखविले आहे.

**पंचखेळ :**

सर्वसामान्य मनुष्याच्या बुद्धिस चालना देणारा 'पंचखेळ' हा इ. स. १८८२ मध्ये भालेकरांनी शोधून काढला. बहुजन समाजाची उन्नती व्हावी हा त्या खेळाचा उद्देश आहे. हा खेळ अज्ञानी वर्गातील लोकांच्या मुलांना खेळता यावा यासाठी या खेळाची निर्मिती केली आहे. या वाङ्‌मयीन खेळास 'दीनमित्रकार' मुकूंदराव पाटील यांनी 'राष्ट्रीय गंजिफा'[३२] असे नाव दिले आहे. हा खेळ मुख्यत्वेकरून पानांनी खेळला जातो. यामध्ये १२० पाने असतात. हा राजकीय मताचा खेळ आहे.[३३] या खेळामध्ये म्हणींचा समावेश केला आहे.

**उपसंहार :**

प्रस्तुत प्रकरणात कृष्णराव भालेकरांचे जीवनचरित्र व सामाजिक कार्य यांचा अभ्यास केलेला आहे. महात्मा फुले यांनी २४ सप्टेंबर १८७३ रोजी सत्यशोधक समाजाची स्थापना केली. भालेकर सत्यशोधक समाजाच्या कार्यात सुरुवातीपासूनच होते. त्यांनी 'सत्यनारायण व पुराणिक' व 'अज्ञानराव भोळे देशमुख' नावाचे फार्स केले. त्याचबरोबर 'हितोपदेशक भजन समाज' नावाची संस्था स्थापन केली. उपदेशपर व्याख्याने, सभा, परिषदा, दौरे आयोजित केलेले आढळतात.

कृष्णराव भालेकरांनी 'दीनबंधू' नावाचे वर्तमानपत्र सुरू केले. शेतकरी, कष्टकरी, मजूर हे पत्राचे केंद्रस्थान होते. बहुजन समाजाची जागृती व्हावी म्हणून भालेकरांनी हे पत्र सुरू केले. सत्यशोधक समाजाचा प्रसार करणे, शेतकरी, कामगार, मजूर यांची गाऱ्हाणी मांडणे हे 'दीनबंधू'चे मुख्य ध्येय होते. गणपत सखाराम पाटील यांच्या मदतीने भालेकरांनी 'दीनमित्र' नावाचे मासिक काढले. या पत्रातून भालेकरांचे लेख, रचना, श्रीखंड, पोवाडे, लावणी व 'बळीबा पाटील' नावाची कादंबरी प्रसिद्ध झाली. शूद्रातिशूद्रजनांची सुधारणा करावी या उद्देशाने 'अंबालहरी' पत्र चालू झाले. या पत्रातून प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत व्हावे यावर अधिक भर दिला आहे. भालेकरांनी या पत्राची लिखाणाची बाजू सांभाळली आहे. तसेच भालेकरांनी 'शेतकऱ्यांचा कैवारी' हे पाक्षिक सुरू केले. मागासलेल्या शेतकरी वर्गाची सुधारणा करणे हा उद्देश त्यामागे होता. या पत्रातून निवडक बातमीपत्रे, वर्तमानसार, वाचकांचा पत्रव्यवहार इ. मजकूर त्याचबरोबर भालेकरांचे 'राज्यशकट' नावाचे चित्र प्रसिद्ध झाले. सत्यशोधक समाजाचा प्रसार करणारे 'राघवभूषण' नावाचे साप्ताहिक होते. या पत्रातून भालेकरांना पोलिसांनी पकडून पुराव्याची मागणी केली होती. पुराव्याचे उत्तर देण्यासाठी भालेकरांनी 'राघवभूषण' या पत्राचा उपयोग केला आहे.

कृष्णराव भालेकरांनी 'सुशिक्षणगृह' सुरू केले. खेडोपाडी शेतकऱ्यांची मुले अनेक कारणांमुळे शाळेत जात नव्हती. ती शिकून शहाणी व्हावीत यासाठी पुणे पेठ कसबा येथे 'सुशिक्षणगृह' स्थापन केले. त्याचबरोबर व्यापार किंवा नोकरी करणाऱ्यांना पाटील, देशमुख, इनामदार या लोकांना आपल्या मुलांच्या शिक्षणाकडे लक्ष देता येत नव्हते. या जाणिवेतून भालेकरांनी 'सुशिक्षणगृह' सुरू केले. भालेकरांनी मागासवर्गीय व अशिक्षित लोकांच्या हितासाठी 'दीनबंधू सार्वजनिक सभा' स्थापन केली. या सभेमध्ये प्राथमिक शिक्षण सक्तीचे करण्याबाबत भर दिला आहे. यासाठी सरकारकडे ठराव पास केला होता. राजकीय कामे करण्याचे श्रेय भालेकरांना दिले जाते.

याशिवाय भालेकरांनी 'दीनबंधू फ्री स्कूल' सुरू केले. बहुजन समाजातील अज्ञानी, अशिक्षित लोकांच्या मुला-मुलींना शिक्षण मिळावे म्हणून भालेकरांनी 'फ्री स्कूल' सुरू

केले. अलाहाबाद येथे राष्ट्रीय अधिवेशनाच्यावेळी एक सभा घेतली. या सभेत भालेकर यांच्याबरोबर डॉ. भांडारकर, न्या. रानडे यांचा मिरवणुकीत सहभाग होता. या प्रचारतंत्रासाठी मिरवणुका, मेळावे, सत्कार, समारंभ आयोजित केले होते.

'चित्रे' या प्रभावी साधनांचा वापर करून भालेकरांनी शेतकऱ्यांच्या सत्यस्थितीचे वर्णन केले आहे. 'राघू गाडीवाना'च्या चित्रामधून शेतकऱ्यांच्या दु:खपूर्ण जीवनाचे दर्शन घडविले. अज्ञानी शेतकऱ्यांच्या दारिद्र्यावर 'शेतकऱ्याचा देखावा' यामधून प्रकाश टाकला आहे. तर 'गावगाडा'मधून कष्टकरी शेतकऱ्याची पिळवणूक कशी होते, पाटील, सावकार, पुरोहितवर्ग व सरकरी अंमलदार यांचा कसा गैरफायदा घेतात याचे दर्दभरी चित्र काढून प्रकाशित केले आहे. शेतकऱ्यांच्या करुण कहाणीचे दर्शन 'व्याजाचा उंट' या चित्रातून घडविले आहे.

याबरोबरच कृष्णराव भालेकरांनी 'पंचखेळा'ची निर्मिती केली. बहुजन समाजाची उन्नती व्हावी हा त्या खेळामागे उद्देश होता. यासाठी हा वाङ्मयीन खेळ शोधून काढला आहे.

**कै. कृष्णराव पांडुरंग भालेकर : जीवनपट (१८५०-१९१०)**

| घटना | वर्ष |
|---|---|
| १) पुण्याजवळील भांबुर्डे येथे जन्म झाला | १८५० |
| २) पुणे येथील रविवार पेठेत मिशन स्कूलमध्ये चौथीपर्यंत शिक्षण | १८६४ ते १८६८ |
| ३) डिस्ट्रिक्ट जज्ज कोर्टात इंग्रजी ऑफिसात उमेदवारी करू लागले<br>'सत्यनारायण पुराणिक' व 'अज्ञानराव भोळे देशमुख' नावाचे फार्स | १८६८ |
| ४) भांबुर्ड्यास एक लायब्ररी काढली. 'हितोपदेशक भजन समाज' संस्था | १८७१ |
| ५) चांदीचे कडे जिंकले. डिस्ट्रीक्ट जज्जाचे कोर्टातील कारकुनाची नोकरी सोडली | १८७४ |
| ६) 'पुना कमर्शिअल अँड. कॉन्ट्रॅक्टिंग कंपनी'त भागीदार झाले | १८७५ |

स्वामी दयानंद सरस्वतीचे भाषण रोकडोबाच्या देवळामागच्या धर्मशाळेत घडवून आणले.

७) 'हितोपदेश' नावाच्या भजनी अभंगाच्या रचना १८७६

८) 'दीनबंधू' प्रसिद्ध झाला १ जाने. १८७७

९) पुण्यास एका थिएटरमध्ये स्त्रियांच्या निबंध वाचनाचा समारंभ १८७९

१०) बारामती तालुक्यात स्वामीची चिंचोलीस शेतकऱ्यांची एक प्रचंड सभा १८८०

११) निरा कॅनॉलवर हेडवर्कवर सब ओव्हरसिअरचे काम केले. १८८१ ते १८८३

१२) 'पंचखेळ' १८८२

१३) 'सुशिक्षणगृह' १ जून १८८३

१४) 'दीनबंधू सार्वजनिक सभा' १८८४

१५) गुढी पाडव्याच्या दिवशी पुणे शहरातून सत्यशोधक झेंड्याची मिरवणूक १८८५

१६) मुंबईच्या तान्सा तलावाच्या बांधकामाचे पोट कंत्राट घेतले. १८८७-८८

१७) 'दीनमित्र' प्रसिद्ध झाला. १८८८

१८) 'दीनबंधू फ्री स्कूल' १८८९

१९) 'शेतकऱ्यांची कैवारी', भालेकर, म्हस्के यांच्या डेक्कन मराठा असोसिएशनमध्ये सहभागी झाले होते. १८९३

२०) शेतकऱ्यांचा कापडी पुतळा उभा केला. १८९५

२१) मनमाड गोदावरी व्हॅली रेल्वेच्या कामाकडे वळले. १८९८

२२) निझाम स्टेट फॅमिन रिलीफच्या कामावर गेले. १९००

२३) जबलपूर गोंदिया रेल्वेच्या कामाकडे वळले. करजगाव येथे व्याख्याने केली. धर्मविषयक व 'कारखाने आणि व्यापार चालविणारी शेतकरी मंडळी'. १९०२ - ०३

२४) अमरावती जिल्हा बेलुरा येथे यशवंतराव देशमुख यांच्या मदतीने विहिरीतून पाणी खेचण्याचे यंत्रप्रयोग केले. १९०४

२५) अहमदनगर येथे नोकरी १९०७

२६) विठ्ठल रामशी शिंदे यांच्या सहवासात १९०८

२७) माळी परिषदेची पूर्वतयारी नगर, पुणे, मुंबई येथे व्याख्यानासाठी दौरा काढला. १९०९

२८) 'दीनमित्र'साठी प्रेस खरेदी केला. १९१०

निधन ७ मे १९१०

**संदर्भ सूची :-**


१) य. दि. फडके, 'महात्मा फुले समग्र वाङ्मय', महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, आवृत्ती पाचवी, पृ. १९५.

२) धनंजय कीर, 'महात्मा जोतीराव फुले आमच्या समाजक्रांतीचे जनक', पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, चौथी आवृत्ती १९९२, १९९३, पृ. १०९.

३) 'महात्मा फुले व्यक्तित्त्व आणि विचार : गं. बा. सरदार, ग्रंथाली अभिनव वाचक चळवळ, मुंबई, आवृत्ती द्वितीया, नोव्हेंबर १९८२.

४) कृष्णराव भालेकर समग्र वाङ्मय, प्रा. सीताराम रायकर, महात्मा फुले समता प्रतिष्ठान प्रकाशन, पुणे, पृ. १६.

५) उनि 'कृष्णराव भालेकर समग्र वाङ्मय', पृ. १६.

६) उनि 'महात्मा जोतीराव फुले आमच्या समाजक्रांतीचे जनक', पृ. १६८-१६९.

७) पंढरीनाथ सिताराम पाटील, 'महात्मा जोतीराव फुले' मनोविकास प्रकाशन, पुणे, सुधारित आवृत्ती, एप्रिल २००५, पृ. ९३.

८) 'सत्यशोधक दीनमित्रकार मुकुंदराव पाटील समग्र वाङ्मय', महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, जुलै १९९०, पृ. १४.

९) रा. के. लेले, 'मराठी वृत्तपत्रांचा इतिहास', कॉन्टिनेन्टल प्रकाशन, विजयानगर, पुणे, ३०, प्रथमावृत्ती १९८४, पृ. २०२.

१०) उनि 'महात्मा जोतीराव फुले आमच्या समाजक्रांतीचे जनक', पृ. १७४.

११) तत्रैव, पृ. १७५.

१२) हरी नरके (सं) 'आम्ही पाहिलेले फुले' महात्मा फुले चरित्र साधने प्रकाशन समिती, मुंबई, प्रथमावृत्ती १९९६, पृ. ४७.

१३) 'पहिले सत्यशोधकी साहित्य संमेलन', लातूर, २० व २१ डिसेंबर २००३, स्मरणिका, पृ. ६६.

१४) उनि 'कृष्णराव भालेकर समग्र वाङ्मय', पृ. १८.

१५) उनि 'महात्मा जोतीराव फुले आमच्या समाजक्रांतीचे जनक', पृ. २६६.

१६) श्रीपतराव शिंदे, 'विजयी मराठाकार – माधवराव शिंदे, महाराष्ट्र, इतिहास प्रबोधिनी कोल्हापूर, ३ मार्च १९७५, पृ. १९.

१७) दीनमित्र सिल्व्हर ज्युबिली, १९३८, पृ. २.

१८) उनि 'कृष्णराव भालेकर समग्र वाङ्मय', पृ. १८.

१९) उनि 'मराठी वृत्तपत्रांचा इतिहास', पृ. २१५.

२०) दीनमित्र, ऑगस्ट १९२२.

२१) उनि 'मराठी वृत्तपत्रांचा इतिहास', पृ. ५१५.

२२) उनि दीनमित्र ऑगस्ट १९२२.

२३) उनि 'कृष्णराव भालेकर समग्र वाङ्मय', पृ. १२.

२४) तत्रैव, पृ. १३.

२५) तत्रैव, पृ. १६.

२६) तत्रैव, पृ. १६.

२७) तत्रैव, पृ. २१.

२८) 'अखिल भारतीय सत्यशोधक समाज', सं. पा. अशोक एरंडे, २८ वे अधिवेशन १९९९, तरवडी मुकुंदनगर, पृ. ५०.

२९) 'सत्यशोधक पत्रकार' डॉ. भालचन्द्र फडके, प्रचार प्रकाशन, कोल्हापूर, ४१६००८ प्रथमावृत्ती/मे ९७, पृ. ५०.

३०) उनि दीनमित्र सिल्व्हर ज्युबिली, पृ. ४.

३१) उनि 'सत्यशोधक पत्रकार', पृ. ५०.

३२) उनि 'सत्यशोधक दीनमित्रकार मुकुंदराव पाटील', समग्र वाङ्मय, पृ. १५.

३३) उनि दीनमित्र सिल्व्हर ज्युबिली , जाने. १९३८, पृ. ३.